
प्रो. डॉ. विलास दौलतराव आवारी गौरव ग्रंथ

# भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे: समीक्षा



संपादक

डॉ. विलास विठ्ठल नाबदे

Scanned with OKEN Scanner

# भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे : समीक्षा

:: संपादक ::

**डॉ. विलास विठ्ठल नाबदे**

सहा. प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
अहमदनगर महाविद्यालय, अ.नगर

पुनम पब्लिकेशन

१२३/१, बी–ब्लॉक, गल्ली नं. ८, भैजनपुरा, दिल्ली – ११० ०५३

Scanned with OKEN Scanner

भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे : समीक्षा

ISBN : 978-93-93366-04-7

© संपादक

**प्रकाशक :**
सौरभ सिंग
**पुनम पब्लिकेशन**
१२३/१, बी-ब्लॉक, गल्ली नं. ८, भैजनपुरा,
दिल्ली - ११० ०५३

**टाईपसेटींग :**
दिनेश बोरीकर
डाटा-लाईन कॅम्प्युटर्स,
५८३, हंसापूरी, छोटी खदान, नागपूर- १८.
मो. ९३७११५०४६७

**मुद्रक**
पुनम पब्लिकेशन
दिल्ली - ११० ०५३

किंमत : **११०० रुपये**

(ग्रंथातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | लोकशाही संकटात आहे का? भारताचा अनुभव काय सांगतो? | - | डॉ. विठ्ठल दहिफळे | १ |
| २. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने - "भय इथले संपत नाही." | - | गणेश महादेव सातपुते | १६ |
| ३. | भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे : स्थित्यंतरे आणि वाटचाल | - | सविता तानाजी घोगरे | २० |
| ४. | भारतीय लोकशाही – संविधान– एक सर्वांगिण शिक्षण ..... | - | अभिन संपत पोटे | २६ |
| ५. | भारतीय संसदीय लोकशाही–आव्हाने आणि उपाय | - | डॉ. भागवत शंकर महाले | ३० |
| ६. | भारतीय लोकशाही : वाटचाल आणि भवितव्य | - | ममता जयराम इंदापुरे | ३८ |
| ७. | भारतीय लोकशाही आणि मतदार वर्तन | - | भोये सुरेश मुरलीधर | ४२ |
| ८. | भारतीय लोकशाही व मतदार वर्तन | - | दिपक बुधवंत | ४८ |
| ९. | भारतीय लोकशाही आणि मतदार वर्तन | - | जमीर मुम्मन इनामदार | ५९ |
| १०. | भारतीय संविधानाची मूलभूत चौकट | - | डॉ. काळे संजय अंकुश | ६६ |
| ११. | भारतीय लोकशाही आणि मतदार वर्तन | - | डॉ. शेख वहिदा अब्दुल रज्जाक गीतांजली शंकरराव चव्हाण | ७३ |
| १२. | भारतीय लोकशाही व मतदाराचे वर्तन | - | शिवलाल कांतीलाल शिंदे | ७८ |
| १३. | भारतीय लोकशाही आणी मतदार वर्तन | - | मोहिनी पांडुरंग झिंजुर्डे | ८२ |
| १४. | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | - | गायत्री गणेश राऊत | ८४ |
| १५. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - | प्रा. डॉ. राजकुमार रिकामे - चंचल मट्टू | ८८ |
| १६. | भारतीय लोकशाही पुढील समकालीन आव्हाने | - | नकुल पोपट खवले | ९७ |
| १७. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - | दाते सुप्रिया सिताराम | १०२ |
| १८. | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | - | डॉ. रविराज अंबादास वटणे | १०७ |
| १९. | आर्थिक लोकशाहीची गरज : आव्हाने आणि भवितव्य | - | डॉ. संदीप इरोळे | ११० |
| २०. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - | महालक्ष्मी सुभाष ठुबे | ११९ |
| २१. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - | नवनाथ विठोबा नागरे | १२३ |
| २२. | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | - | रवी साहेबराव गायकवाड | १२६ |
| २३. | भारतीय लोकशाहीची आव्हाने: संरक्षण– धोरणातील बदल आणि भविष्य | - | डॉ. चंद्रकांत बन्सीधर भांगे | १३० |




Scanned with OKEN Scanner

:: ४ ::

# भारतीय लोकशाही – संविधान – एक सर्वांगिण शिक्षण .....

**अभिन संपत पोटे**
राज्यशास्त्र विभाग

**"हमने कहा आझाद है अब दिल की सुनेगे यहॉं,**
**राहे बनाये हम ही हमारी मंजिल चुनेगे यहॉं,**
**कोई ना छोटा कोई ना बडा मिलके चलेंगे यहॉं,**
**अधिकार सबको जीनेका हो, सर ना झुकेंगे यहॉं,**
**हम लोक We the People."**

**संविधान/राज्यघटना – अर्थ –** फुटबॉल हा भारताचा राष्ट्रीय खेळ आहे व त्या खेळामध्ये दोन संघ सहभागी होत असतात तसेच त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रेक्षक देखील असतात आणि या नियमाचा अर्थ स्पष्ट करण्याकरिता पंच (अम्पायर) ही असतात. ह्या सर्वांमध्ये सर्वात महत्वाचा घटक कोणता? पंच, खेळाडू की प्रेक्षक? अंतिम निर्णय कोणाच्या हातात असतो. कदाचित याचे उत्तर पंचहे असू शकते.परंतु पंच स्वतःच्या मनाने निर्णय देवू शकत नाही. त्यासाठी पंचांना नियमाचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे खेळात नियम किंवा अटी हा सर्वात महत्वाचा घटक ठरतो. नियमांशिवाय खेळाची कल्पनाच अशक्य याच पद्धतीने कोणताही देश नियमांच्या आधारे चालतो. देशाच्या कामकाजाकरिता नियमांची गरज असते. ते सर्व नियम एका पुस्तकात अंतर्भूत केलेले असतात.त्या नियमांच्या संचालाच संविधान किंवा राज्यघटना असे म्हणतात.

संविधान हा देशाचा मुलभूत कायदा असतो. देशातील इतर सर्वच कायदे संविधानापेक्षा दुय्यम ठरतात. तसेच संविधानाच्या चौकटीत शासनाचे सर्व घटक कार्य करतात. शिवाय नागरिकांचे आपआपसातील संबंधाचे स्वरूप संविधानात स्पष्ट असते. संविधान शासनाला सत्ता प्राप्त करून देते. तसेच शासनाला सत्तेच्या मर्यादा ही निश्चित करून देते. नागरिकांच्या मुलभूत हक्क आणि कर्तव्याचा समावेश संविधात केलेला असतो.संविधान हे शासनाच्या लहरी कृतीना मर्यादित ठेवून सार्वभौम सत्तेच्या अंमलबजावणीची व्याख्या करते.

**व्याख्या :-**

१) **ॲरीस्टॉटलच्या मते–** संविधान हे राज्याने आपल्या जीवनासाठी निवडलेला मार्ग असतो.

२) **जे. कुली च्या मते–** ज्यामध्ये शासनाच्या आधारभूत तत्वाचा समावेश असतो. असा राज्याचा मुलभूत कायदा होय.

Scanned with OKEN Scanner

३) **जी. सी. लेविस** च्या मते – संविधान म्हणजे सार्वभौम सत्तेचे योजनाबद्ध रीतीने समाजात किंवा सरकारच्या रचनेमध्ये वाटप करणे होय.

**संविधान वैशिष्टये :–**

१) संविधान हे निर्मित/लिखित असू शकते.

२) संविधानामध्ये शासक वर्गाचे अधिकार, कार्यक्षेत्र नमूद केलेले असते. तसेच लोकांचे अधिकार कर्तव्य हि नमूद असते.

३) शासन व्यवस्थेची निर्मिती व रचना या प्रक्रियेचे वर्णन संविधानामध्ये असते.

४) शासनातील विविध शाखा संबंध परस्परांवरील नियंत्रन इ.चा उल्लेख करण्यात आलेला असतो.

**कोणत्या परिस्थितीत संविधानाची गरज भासते?**

१) सामाजिक,राजकीय क्रांती झाल्यास... उदा. सो.रशिया, चीन.

२) लोक परकीय सत्ता स्वीकारण्यास नकार देतात तेव्हा.उदा. आफ्रिका, आशिया खंडातील देश.

३) छोटी– छोटी राज्ये एकत्र येवून नवीन देश तयार होतो.उदा.अमेरिकेतील तेरा वसाहती एकत्र आल्या.

४) राज्यांचे विभाजन होवून दोन किंवा अधिक राज्य तयार होतात. उदा. पाकिस्तान, बांग्लादेश.

**भारतीय संविधान निर्मिती :–**

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी लॉर्ड माउंट बॅटन महात्मा गांधीजींना म्हणाले होते की, आम्ही इथून गेलो तर सारा गोंधळ होईल. अराजकता निर्माण होईल. भारतीयांना लोकशाहीची सवय नाही.,राज्य कारभार कसा करावा हे त्यांना ठाऊक नाही. यावर महात्मा गांधीजी म्हणाले, गोंधळ किंवा अराजकता निर्माण होईलही पण तो आमचा गोंधळ असेल त्याला जबाबदार आम्ही असू. अर्थात आम्ही भारताचे लोक या चांगल्या वाईट गोष्टींच्या परीणामची जबाबदारी घ्यायला सज्ज आहोत.

पंडित जवाहरलाल नेहरूंनी स्वातंत्र्याच्या मध्यरात्री नियती सोबतच्या काव्यात्मक कराराची आठवण करून दिली व त्या काव्यात्मकतेला अर्थ प्राप्त करून दिला तो डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी आम्ही भारताचे लोक ? कोण ? भारत हा देश अस्तित्वात आला कसा? हे समजून घेण्यासाठी त्या देशातील संविधान हे एक महत्त्वाचे साधन आहे.

जनतेचे भवीतव्य राजाच्या, संस्थानिकांच्या वर्तनावर अवलंबून असत. १७७३ मध्ये बराचसा भारत इंग्रज सरकारच्या इ. स. पु. १६०० मध्ये भारतामध्ये ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. त्या वेळेस भारतामध्ये छोटे छोटे राज्य, संस्थाने यात विखुरलेले होते. १८१८ पर्यंत इंग्रजांनी संपूर्ण भारतावर आपला कब्जा मिळवला इंग्रज शासन हे भारताचे आर्थिक शोषण करत. तंत्रज्ञान देखील भारतात फारसे प्रगत झालेले नव्हते अशा काळात दादाभाई नौरोजी यांनी आर्थिक नि:सारणाचा सिद्धांत मांडून भारतात प्रबोधनाची सुरवात केली. देशात पाश्चात्य शिक्षणाची सुरवात केली. समान सुधारणेच्या कार्यात राजाराम मोहन रॉय, मलबारी, पेरियार, स्वामी नारायण गुरु, म. ज्योतिबा फुले,

Scanned with OKEN Scanner

न्यायमूर्ती रानडे, बिरसा मुंडा, पंडिता रमाबाई सावित्रीबाई फुले इ. समाज सुधारकांनी सामाजिक समतेसाठी आग्रह धरला व त्या मुळे सामाजिक चळवळींना वेग प्राप्त झाला.

१८५७ च्या काळात स्वातंत्राच्या उठाव झाला तसेच १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना सर ह्यूम यांच्या पुढाकाराने झाली.त्याच काळात भारतात जहालमतवादी - मवाळमतवादी गटाची निर्मिती होऊन वेगवेगळे मतप्रवाह समोर येऊ लागले. १९२०मध्ये टिळक युगाचा अंत होऊन गांधी युगाची सुरवात झाली. राष्ट्रीय कॉंग्रेस सर्व सामन्याची चळवळ बनली. सत्याग्रह, सविनय कायदेभंग, असरकार अहिंसा या आयुधांचा प्रभावी वापर सुरु झाला. डॉ. आंबेडकरांनी जातीय अंताची चळवळ सुरु केली. अखेरीस १९४७ ला भारत देश ब्रिटीशानच्या पारतंत्र्यातून मुक्त झाला.

साधारणतः ब्रिटीश साम्रज्याचे दोन काळ सांगता येतात -

१) कंपनीराज (१७७३-१८५७) २) ब्रिटीश सरकार राज (१८५८-१९४७)

ब्रिटीश सरकार राज पासून भारतात संविधान सभा निर्मिती साठी हालचाली सुरु झाल्या. १९३४ मध्ये भारतासाठी एक संविधान सभा असावी अशी कल्पना मानवेंद्रनाथ रॉय यांनी प्रथम मांडली. ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची पहिली बैठक भरली. डॉ. सच्चीदानंद सिन्हा हे तात्पुरते अध्यक्ष म्हणून निवडले. तसेच ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ.राजेंद्रप्रसाद यांची कायम स्वरूपी अध्यक्ष म्हणून निवड केली. घटना समितीच्या कामकाजासाठी आठ मुख्य समित्या व पंधरा उपसमित्याची निर्मिती केली. त्या मधील मसुदा समिती - ही अत्यंत महत्वाची समिती असून डॉ.बाबासाहेब आबेडकर हे त्या समितीचे अध्यक्ष होते.

भारताच्या संविधानातील उद्देशिकेत/सरनाम्यात खालील बाबी महत्वाच्या आहेत .

१) संविधानाच्या अधिमान्यतेचा उगमस्थान - आम्ही भारताचे लोक

२) भारतीय संघराज्य स्वरूप-सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही ,गणराज्य

३) भारतीय संविधान ध्येय-स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामजिक, आर्थिक, राजकीय, न्याय प्रस्थापित करणे.

४) आपलं संविधान-आपण स्वतःप्रत देशाला अर्पण केले आहेत.

## भारतीय संविधान कोणाला अर्पण केलय?

इतर देशाचे संविधान आपण अभ्यासाल तर संविधान हे एखादया व्यक्तीला किंवा देशाला अर्पण केलेल असत. आपणही आपलं भारतीय संविधान राष्ट्रपिता म. गांधीजींना अर्पण कराव असं देखील सुचविल गेले होते. हे सर्व प्रस्ताव नाकारून घटनाकर्त्यानी भारतीय संविधान हे भारतीय लोकांनाच अर्पण केल होत. म्हणजेच स्वतःला अर्पण केल होत. सरनाम्याची शेवटची ओळ आहे. हे संविधान आम्ही स्वतःप्रत अर्पण करीत आहोत.

## संविधानाची उद्देशपत्रिका :-

आपलं आयकार्ड (नाणी पालखीवाला, ज्येष्ठ कायदेतज्ञ) शाळा-कॉलेजच्या आयकार्ड वर नाव, पत्ता, फोन नं. रक्तगट इ.बाबी असतात तसेच आपल्या उद्देश पत्रिकेतही आहेत.आपल्या आयकार्ड वर वैयक्तिक ओळख असते - उद्देशपत्रिकेतील ओळखही आपणा सर्वांची सामुहिक ओळख आहे.

Scanned with OKEN Scanner

आपण कोण आहोत ? आम्ही भारताचे लोक.

आपण कसे आहोत - सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य (स्वातंत्र्य, समता, न्याय) विचार मानणारे आपण आहोत.

सार्वभौम - आपल्या देशाविषयी निर्णय आपणच घेऊ ,इतर कुणीही त्यात हस्तक्षेप करणार नाही.

समानतेविषयी - मुलभूत हक्क - कलम १४-१८

स्वातंत्र्याविषयी - कलम १९-२२

धार्मिक स्वातंत्र्याविषयी कलम - २५ ते २८ - राज्याचा कोणताही अनिधिकृत धर्म असणार नाही.

समाजवाद -उत्पादनाचे योग्य वाटप, समानतापूर्वक वर्तुणूक यासाठी संविधानाच्या चौथ्या भागात राज्यासाठी मार्गदर्शक तत्वे (कलम -३६ ते ५१ )आहे .एकता व एकात्मतेला बाधा पोहोचू नये याची काळजी नागरिकांनी घ्यावी अशी सूचना संविधान देते.या अर्थाने संविधानाची उद्देशिका/ सरनामा हे आपल्या संविधानाचेच आयकार्ड म्हणजे आपल्या सर्वांचे आयकार्ड होय.

बहुलता, लोकशाही आणि विकास ही त्रि-सूत्री पुढे नेण हे संविधानकर्त्यांच व तुमच माझ स्वप्न साकार करण्याच्या दिशेने पाऊल टाकण आहे.संविधानातील कलम पाठ करण्यापेक्षा संविधानातील मूल्य आपल्या जगण्यात प्रत्यक्षात आणणे हे गरजेचे आहे.आपल्या सर्वांचे जगण उजळून निघावं म्हणून संविधान समजून-उमजून वागण्याचा प्रयत्न करूया. संविधान वाचवण किंवा संवैधानिक नैतिकतेचे पालन करून ही कृती आपल्याच भविष्यासाठी अत्यावश्यक आहेत. आपण सामूहिक शहाणपण वाढवत नेण, आपला विवेक खोलवर मुरत जाणं अशी ती एक समृद्ध करणारी प्रक्रिया आहे. तिचा भाग होण ही स्वतःचा स्वताचा दिवा होण अर्थात "अत दीप भवःकडे" जाणारी शोधयात्रा आहे .त्या सामूहिक शोध यात्रेच्या प्रवासात आपला संविधानाचा प्रकाशरूपी कंदील सर्वांच्या सोबत आहे. याचे आपण सर्वांनी भान राखायला हवे.

□□□

Scanned with OKEN Scanner

प्रो. डॉ. विलास दौलतराव आवारी गौरव ग्रंथ

# भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे : समीक्षा

संपादक **डॉ. विलास विठ्ठल नाबदे**



स्वातंत्र्यप्राप्तीपासून भारतीय लोकशाहीच्या निरंतर प्रवासात शासन, राजकीय पक्ष, संयुक्त आघाडी, निवडणूक आयोग, न्याय मंडळ, प्रसारमाध्यमे आणि जनतेचा वाढता सहभाग इ. मुळे लोकशाहीची प्रक्रिया स्थिर होत आहे, ही लोकशाहीची वाटचाल यशस्वी होत असताना विविध स्थित्यंतरानी भारतीय लोकशाहीपुढे आव्हाने निर्माण केली ती आव्हाने घटनात्मक पद्धतीने सोडवित व अंतिम, जनता अधिमान्यतेमुळे भारतीय लोकशाहीने ७५ वर्ष पूर्ण केली सदर पुस्तकातील बहुस्थरीय समीक्षा नव्या पिढीला निश्चित उपयुक्त ठरेल

**डॉ. पी. डी. देवरे**

माजी अध्यक्ष महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद

₹1100/-

ISBN 978-93-93366-04-7

9789393366047

**Poonam Publications**

123/1, B-Block, Gali No. 8, Bhajanpura
Delhi-110 053 (India)
E-mail: poonampublications15@gmail.com
Mob.: 9968065744, 9716644956

Scanned with OKEN Scanner